# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. २८/०२/२०२२

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा सोमवार २८/०२/२०२२ रोजी सभा सुचना क्र. १४ दि. २४/०२/२०२२ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात दुपारी २.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. राकेश शाह हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. राकेश रतिशचंद्र शाह | सभापती |
| २. | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ३. | श्रीम. शानु जोरावर गोहिल | सदस्या |
| ४. | श्रीम. सुनिता रमेश जैन | सदस्या |
| ५. | श्री. आनंद द. मांजरेकर | सदस्य |
| ६. | श्री. मनोज रा. दुबे | सदस्य |
| ७. | श्रीम. सुजाता य. पारधी | सदस्या |
| ८. | श्रीम. सिमा क. शाह | सदस्या |
| ९. | श्री. जयेश भानुदास भोईर | सदस्य |
| १०. | श्री. जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| ११. | श्रीम. शर्मिला बगाजी | सदस्या |
| १२. | श्रीम. अर्चना अ. कदम | सदस्या |
| १३. | श्रीम. कुसुम सं. गुप्ता | सदस्या |
| १४. | श्रीम. मर्लिन म. डिसा | सदस्या |
| १५. | श्री. अशरफ मो. शेख | सदस्य |

**गैरहजर सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सुरेश खंडेलवाल | सदस्य |

मा. सभापती :-

सभेला सुरुवात करावी.

नगरसचिव :-

मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. स्थायी समिती सभा सोमवार दि. २८/०२/२०२२ रोजी दुपारी २.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १४ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. 163, दि. 07/12/2021 व दि. 18/01/2022 रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

मर्लिन डिसा :-

मी टॉपीक काढला होता 1 डिसेंबरपासून सगळे आर.जी. प्लॉट बंद केले होते तर त्याविषयी काय ठरले आहे.

हसमुख गेहलोत :-

इतिवृत्तांत मंजूर करुन घ्या.

शानू गोहिल :-

दि. 07/12/2021 व दि. 18/01/2022 रोजींच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुनिता जैन :-

माझे अनुमोदन आहे.

प्रकरण क्र. 163 :-

दि. 07/12/2021 व दि. 18/01/2022 रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. 135 :-

दि. 07/12/2021 व दि. 18/01/2022 रोजींच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्रीम. शानु गोहिल अनुमोदन :- श्रीम. सुनिता जैन**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 164, मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २०२१-२२ चे सुधारित व सन २०२२-२३ चे मूळ अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणेबाबत. ("अ" + "क" + "महिला व बालकल्याण" + "अंध व अपंग" + "JNNURM" + "P" + "वृक्षप्राधिकरण" + "शिक्षण") प्रकरण क्र.165, परिवहन सेवेचे सन २०२१-२२ चे सुधारित व सन २०२२-२३ चे मूळ अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणेबाबत. प्रकरण क्र.166, अग्निशमन विभागाचे सन २०२१-२२ चे सुधारित व सन २०२२-२३ चे मूळ अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणेबाबत सन्मा. आयुक्त स्थायी समितीसमोर बजेट सादर करतात.

मा. आयुक्त :-

सर्वांना नमस्कार. आज महापालिकेचा वर्धापन दिन आहे. त्यानिमित्त सर्वांचे आभार व्यक्त करतो. आज मिरा भाईंदर महानगरपालिकेचा सन 2021-22 चे सुधारीत व 2022-23 चे मूळ अंदाजपत्रक सादर करत आहे. मा. श्री. राकेश शहा, सभापती, स्थायी समिती तसेच स्थायी समितीचे सर्व सन्माननीय सदस्य, उपस्थित अधिकारी व कर्मचारी वर्ग व पत्रकार बंधू भगिनीनो. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 95 नुसार, मिरा भाईंदर महानगरपालिकेचा सन 2021-22 चा सुधारित व सन 2022-23 चा मुळ अर्थसंकल्प आपणांस सादर करताना मला आनंद होत आहे. सदर अंदाजपत्रक तयार करताना ते वास्तववादी व पारदर्शक तसेच सर्वसमावेशक राहील, याची दक्षता घेण्यात आलेली आहे.

मागील वर्षी कोरोना सारख्या भयंकर अशा महामारीने राज्य, देश आणि शहर ग्रासले होते. अशा आपत्तीजन्य परिस्थितीत महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री श्री. उध्दवजी ठाकरे साहेब, मा. मंत्री नगर विकास

तथा ठाणे व गडचिरोली जिल्हयाचे पालकमंत्री श्री एकनाथजी शिंदे साहेब, मा. महापौर श्रीम. जोत्स्ना हसनाळे, मा. खासदार राजन विचारे साहेब, मा. आमदार प्रताप सरनाईक साहेब, मा. आमदार गिता जैन मॅडम, सर्व सन्मा. सदस्य, सर्व नगरसेवक, स्थानिक प्रशासन तसेच पोलीस प्रशासन, सर्व सेवा भावी संस्था, पत्रकार बंधू भगिनी व समस्त नागरीक यांच्या सहकार्यामुळे, आपल्या शहरात कोरोनाच्या दुसऱ्या व तिसऱ्या लाटेवर व्यवस्थित नियोजन करुन त्यावर मात करता आली आणि आपत्ती व्यवस्थापनात देखील आपल्या महापालिकेने अतिशय चांगली कामगिर केली. भविष्यात सुध्दा आपण कोरोना सारख्या महामारीचा सामना करण्यासाठी आजही सज्ज आहोत. कोरोनासाठी आय.सी.यू.,ऑक्सीजन-बेड, औषधे याबाबत केंद्र व राज्य शासन यांनी दिलेल्या इष्टांकापेक्षा आपली क्षमता दुप्पटीने वाढलेली आहे. म्हणून कोरोना किंवा अनुशंगिक रोगाचे आपल्यावर हमला झाला तरी आपण त्यासाठी सज्ज आहोत तसेच नागरीकांचे लसीकरण ह्यात आपली महापालिका इतर महापालिकेपेक्षा आघाडीवर राहिलेली आहे. आणि नेहमी केंद्र व राज्य शासन यांच्या सहकार्यामुळेच व आपल्या सर्वांची मोलाची साथ लाभल्यामुळे शक्य झाले आहे.

मला सांगायला आवडेल की कोरोनाशी लढा देत असताना शासन स्तरावर आव्हान देत असलेल्या अभियानात महानगरपालिकेने वेगवेगळी पारितोषिके मिळवली असहेत. आपणांस सांगण्यात आनंद होतो की, “सफाई मित्र सुरक्षा चॅलेंज” या राष्ट्रीय अभियानात मिरा भाईंदर महानगरपालिकेने राज्यात दुसरा क्रमांक पटकावला आहे. तसेच स्वच्छ सर्वेक्षण 2021 मध्ये 9 वा क्रमांक मिळवला आहे. आता केंद्र शासन पुरस्कृत स्वच्छ भारत अभियान 2022 तसेच राज्य शासनाच्या माझी वसुंधरा अभियान यामध्ये सहभाग घेतला असून आपल्या सर्वांच्या सहकार्याने देशात/राज्यात अव्वल येण्याचा ह्या महापालिकेचा मानस आहे. प्रशासन कामालादेखील लागलेले आहेत.

मिरा भाईंदर महापालिकेचीची लोकसंख्या अंदाजे 12 लाखावर गेली आहे. तसेच हे शहर मुंबई-ठाणे यांचे लगत असल्याने स्थलांतराचे प्रमाण ह्या शहरात इतर शहराच्या तुलनेत जास्त आहे. शहराची लोकसंख्या झपाटयाने वाढत आहे. यामुळे शासन नियमानुसार जेव्हा आपली जनगणना होईल तेव्हा आपली “ड” महापालिकेमधून “क” मध्ये समावेश होणार आहे. वाढत्या लोकसंख्येच्या मुलभूत सेवा सुविधा, गरजा त्या सोबतच शहराचा सर्वांगीण विकास साधणे, ही एक आव्हानात्मक जबाबदारी आहे. आपण पेलत आहोत. शहराचा सर्वांगीण विकास करणे गरजेचे असते. जसे रस्ते, वीज, पाणी या मुलभूत गरजा सोबतच इतर सेवा देणे हे आवश्यक आहे. यामध्ये दुर्बल घटकांना घरे देणे, स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून देणे, महिला व बाल विकास, आरोग्य सुविधा व स्वच्छता या सेवा पुरवित असताना, पर्यावरण संवर्धन ही महत्वाची जबाबदारी आपल्यावर आहे. आणि हाच उद्देश लक्षात ठेवून आजचा पर्यावरणपूरक अर्थसंकल्प आपणा समोर सादर करीत आहे. महापालिकेचे उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत हे मालमत्ता कर आहे. याव्यतिरिक्त शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीतून शहरातील विविध विकास प्रकल्प प्रस्तावित आहेत. आणि आपण ते राबवत आहोत. यामध्ये शहराचे सुशोभिकरण व विकास कामे भारतीय स्वातंत्र्यांचे अमृत महोत्सवी वर्ष सुरु असून, या वर्षात सर्व महापुरुष स्वातंत्र्यसेनांनी यांना स्मरण करून भावी पिढीला त्यांच्या कार्याचे स्मरण करून देणे अपेक्षित आहे. या अभियानाचा एक भाग म्हणून शहरातील ऐतिहासिक किल्ले घोडबंदर व किल्ले धारावी जंजिरे यांचा विकास करण्यांत येत आहे. त्यादृष्टीने काम हाती घेण्यात आले आहे. शिवसृष्टी उभारणेसाठी राज्य शासनाने रु. 53.68 कोटीचा प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असून पालिकेतर्फे या कामासाठी विशेष रु.7 कोटीची तरतुद करण्यात आली आहे. यावर्षी सर्वात महत्वाची बाब म्हणजे पेशवे चिमाजी आप्पा स्मारक व धारावी जंजिरे किल्ला विकास उत्तन धारावी जंजिरे किल्लाचे संवर्धनासाठी यावर्षी पालिकेतर्फे विशेष रु. 2 कोटीची तरतुद करण्यात येत आहे. ही तरतुद आपण पहिल्यांदाच करीत आहोत. तसेच सदर किल्ल्यावर पेशवे

चिमाजी अप्पा यांचा अश्वारुढ पुतळा उभारण्यांत आला आहे.त्याचे सुशोभिकरण जवळपास पूर्ण करण्यांत आलेले आहे. पर्यावरण संवर्धन व संरक्षण, आटोक्यात ठेवणे, शहर स्वच्छ-सुंदर व हरित ठेवणे याविषयी भरीव काम करण्याचा प्रशासनाचा मानस आहे. यासाठी नविन लेखाशिर्ष तयार केला आहे. "शहराचे सुशोभिकरण/सौंदर्यीकरण/देखभाल दुरुस्ती व तांत्रीक सल्लागार नेमणे" अशा आशयाचे लेखाशिर्ष तयार करुन त्यावर रु.5 कोटीची तरतूद करण्यांत आलेली आहे. सर्वात महत्वाचे पर्यावरण विभागाची निर्मिती इतर महापालिकेचा तुलनात्मक अभ्यास केला असता आपल्या महापालिकेमध्ये पर्यावरण विभाग स्वतंत्रपणे कार्यरत नव्हता. ही बाब विचारात घेऊन केंद्र आणि राज्य शासनाच्या मार्गदर्शक सुचना, मार्गदर्शन तत्वांनुसार पर्यावरण संवर्धन करणे हा महत्वाचा विषय आहे. राज्य शासनाकडून माझी वसुंधरा अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानात महापालिका देखिल सहभागी आहे. यासाठी आम्ही स्वतंत्र पर्यावरण विभागाची निर्मिती केली आहे. सदर चालू अंदाजपत्रकात पर्यावरण विभागासाठी रु. 1 कोटीची नव्याने तरतूद करण्यात आली आहे. शासनाच्या 15 व्या वित्त आयोगातून हवेची गुणवत्ता सुधारणे इतर प्रदुषणावर मात करणे आणि पुढील 5 वर्षात अंदाजे रु.80 कोटी निधी प्राप्त होणार आहे. चालू वर्षी या कामासाठी शासनाकडून 21 कोटी निधी प्राप्त झालेला आहे. दुसरे महत्वाचे म्हणजे शहरात सिमेंट काँक्रिटचे रस्ते तयार करणे शहराची ओळख ही त्या शहरातील असलेले रस्ते आणि इन्फास्ट्रक्चर यावरुन ओळखली जाते.  मा.महासभेने पारीत केलेल्या प्रस्तावानुसार मिरा-भाईंदर शहरात सुमारे 1000 कोटींचे सिमेंट काँक्रिटचे रस्ते येत्या 5 वर्षात बांधावयाचे आहेत. त्यासाठी चालू वित्तीय वर्षात रु.110 कोटीची आर्थिक तरतूद केलेली आहे. हे करत असताना महिला व बालकांचा विकास तितकाच भाग असून महिला व बालकांचा सर्वांगिण विकास करण्यासाठी तसेच त्यांना शिक्षण, सुविधा व इतर सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी चालू अर्थसंकल्पामध्ये एकूण रु.5.50 कोटीची तरतूद विविध लेखाशिर्षाखाली करण्यांत येत आहे. महापालिकेच्या  समाज मंदिरा मध्ये घरोघरी गरोदर महिलांसाठी बाल संगोपन केंद्र सुरु करणे, तसेच इयता 10-12 च्या मुलांना प्राविण्य मिळण्यासाठी विशेष मार्गदर्शन वर्ग  सुरु करणे, योगा केंद्र सुरु करणे, व्यक्तिमत्व विकास कोर्स, इनडोअर व आऊटडोअर खेळाचे मैदान उपलब्ध करुन देण्यासाठी अर्थसंकल्पात तरतुद केलेली आहे. त्याचप्रमाणे समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील होण्यासाठी दिव्यांगाकरिता नवघर येथे आरक्षण क्र. 115 मध्ये स्वतंत्र शाळेची इमारत बांधण्याच काम सुरु आहे. ते लवकरच पूर्णत्वाला जाईल आणि त्याठिकाणी त्यांच्यासाठी आरोग्य सुविधा उपलब्ध करुन दिली जाईल. फिजियोथेरेपी नव्याने ॲडीशन करुन त्यांना प्रशिक्षण देऊन सर्वांगीण करण्यासाठी रु.3.75 कोटीची तरतूद ह्या अर्थसंकल्पात करण्यांत आली आहे. त्याचप्रमाणे सामान्य प्रशासन विभाग ई लायब्ररी आणि रेफरन्स हा शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी ई लायब्ररी  तयार करण्यांत आलेली असून यामध्ये विविध शासन निर्णय, अधिसूचना कायदे, उपविधी यांचे संदर्भ असतील. याकरिता आवश्यक तरतूद करण्यांत आली आहे. त्याचबरोबर कर सांख्यिकी विश्लेषण प्रणाली टॅक्स स्टॅटीस्टीक ॲनलिस्ट सिस्टम हे मालमत्ता कर व पाणीपट्टी कर वसूली हे काम जलद गतीने होऊन त्यामध्ये पारदर्शकता करत असताना कामाची गती देखील वाढली पाहिजे. म्हणून थकबाकीचे विशिष्ठ उद्दीष्ट गाठून त्यासाठी कर सांख्यिकी विश्लेषण प्रणाली सक्षम करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेने प्रचलित कर प्रणालीमध्ये सांख्यिकी विश्लेषण करून अद्यावत कर विश्लेषण प्रणालीला लागू करण्याचे प्रस्तावित केले आहे. याकरिता मालमत्ता कर पुर्नमुल्यांकन करणे कर सांख्यिकी व सर्वेक्षण करणे विश्लेषण प्रणाली या लेखाशिर्षाअंतर्गत रु.6 कोटीची तरतूद करण्यांत आली आहे. शासकिय विद्युत वाहन आणि विद्युत चार्जिंग केंद्र स्थापना करणे. वाहन विभाग/ सार्वजनिक बांधकाम विभाग/नगररचना विभाग जागतिक पर्यावरणाचा शाश्वत विचार करून प्रदूषण कमी करण्याच्या दृष्टीकोनातून हा अतिशय नाविन्यपूर्ण प्रकल्प असून ही योजना हाती घेतली आहे. राज्य आणि केंद्र शासनाचे धोरण आहे येत्या 2-3 वर्षात सर्व वाहने विद्युत प्रणालीवर

चालविण्याचे शासनाचे धोरण असल्यामुळे आपण राज्य शासन विद्युत वाहनांच्या वापरावर आग्रही आहे. पर्यावरणाचा ऱ्हास टाळण्यासाठी मिरा-भाईंदर महानगरपालिका एक पाऊल पुढे टाकत आहे. आगामी वर्षात टप्प्याटप्प्याने महानगरपालिकेची सर्व वाहने तसेच कंत्राटी वाहने यांचे इलेक्ट्रिक वाहनांमध्ये परिवर्तन करण्याबाबत महापालिका योजना प्रस्तावित करीत आहे. यामुळे 30 ते 35 टक्के इंधनात बचत होणार आहे. आणि नविन वाहन खरेदी करण्यासाठी रु.50 लक्ष इतकी तरतूद करण्यांत आलेली आहे. ह्याचा एक भाग म्हणून परिवहन सेवासाठी 8 कोटी रुपये इलेक्ट्रीक बस खरेदी करण्यासाठी अंतर्भुत केलेले आहे. एकात्मिक खटला/दावा/लवाद व्यवस्थापन करण्याच्या अनुषंगाने विधी विभागाची व्यवस्थापन योजना आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रात बरीच अनधिकृत बांधकामे, नगररचना विभागाशी संबंधित दावे/खटले/लवाद व इतर विभागाचे बरेच खटले मा. न्यायालयात प्रलंबित आहेत. यासर्व न्यायप्रविष्ट प्रकरणामध्ये सुसूत्रता आणणे प्रकरणाचा जलदगतीने निपटारा करणेसाठी विधी विभाग सक्षम होणे आवश्यक आहे ह्याचाच एक भाग म्हणून एकात्मिक खटला/दावा/लवाद व्यवस्थापन उपायोजना प्रणाली लागू करण्याकरिता आपण रु.50 लक्ष तरतूद करण्यांत येत आहे. जेणेकरुन आपले खटले सक्षमपणे निकाली काढणे शक्य होईल. आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन गॅलरी आणि अभ्यास प्रेक्षागृह हा एक आपत्ती व्यवस्थापनाचा भाग असून ह्या शहराजवळ तीन बाजूनी खाडी आणि एक बाजूला जंगल आहे. नेहमीच आपल्याला नैसर्गिक आपत्तीला तोंड द्यावे लागते म्हणून नागरीकांना आत्मनिर्भर करण्यासाठी मार्गदर्शन/प्रशिक्षण मिळणे आवश्यक असून याकरिता आपत्ती व्यवस्थापन अजून सक्षम करुन जास्तीत जास्त नागरिकांना कुठल्याही नैसर्गिक आपत्तीपासून सुटकारा मिळण्यासाठी व त्यांचे संरक्षण होण्यासाठी रु. 6 कोटीची आर्थिक तरतूद करण्यांत आली आहे. हे करत असताना अधिकारी/कर्मचारी ह्यांचे प्रशिक्षण देखील महत्वाचे आहे. मिरा-भाईंदर शहराची वाढ झपाटयाने होत असल्यामुळे मोठया प्रमाणात विकास कामे होणार आहेत. महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यांत आलेल्या विकास कामांमध्ये नवीन अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर करून कामाचा उत्तम दर्जा राखणे आणि कामांच्या पर्यवेक्षणातील कौशल्य वाढवणे याकरिता आय.आय.टी मुंबई, यशदा पुणे यासारख्या प्रशिक्षण संस्थेकडून आपल्या इंजिनिअर तसेच वेगवेगळे अधिकारी कर्मचारी ह्यांना शहराचा विकास करताना अद्यावत ज्ञान असणे अपेक्षित असल्याने आपण कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी 25 लाखाची तरतूद केली आहे. हे सर्व करताना महापालिकेचे अभिलेख जतन करणे व संगणकिकरण सक्षम असणे काळाची गरज आहे. म्हणून अभिलेख जतन करणे व त्यांचे वर्गीकरण करुन संगणकीकृत करणे, अभिलेख कक्ष अद्यावत करणे, यासाठी विशेष रु.50 लक्ष इतकी तरतूद करण्यांत आली आहे. हे सर्व करत असताना महापालिका शालेय शिक्षणाचा दर्जा उंचावणे शिक्षण विभागाचे वेगळे काम ह्या अर्थसंकल्पात हाती घेतले आहे. जगाची व्यवहारी भाषा म्हणून इंग्रजीचा वापर केला जातो. आणि जगातल्या स्पर्धेत टिकण्यासाठी इंग्रजी भाषा येणे आवश्यक आहे म्हणून हल्ली इंग्रजी शाळेकडे पालकांचा जास्त कल असतो. त्याचा मध्यमार्ग म्हणून आपण इयत्ता 5 वी ते 8 वी पर्यंत सेमी इग्लिश ह्या शैक्षणिक वर्षापासून सुरु करत आहोत. त्याचप्रमाणे आपल्याकडेच इयत्ता 9 वी ते 10 वी च्या विद्यार्थ्यांनी पुढे कुठे जायचे हा एक नेहमी अडचणीचा मुद्दा होतो. म्हणून ह्यावर्षी 9 वी आणि 10 चे वर्ग देखील सुरु करण्याचे ह्या अर्थसंकल्पात प्रस्तावित केले आहे. जेणेकरुन पहिली ते दहावी आपल्या महापालिकेच्या शाळेत शिक्षण देता येईल ते करत असताना सेमी इंग्रजी शिक्षण असल्यामुळे मुलांना इंग्रजीच्या बाबतीत जो न्यूनगंड आहे तो राहणार नाही. त्यांचे इंग्रजीचे ज्ञान अजून अद्यावत होईल. त्याचप्रमाणे ह्या शहराला पाणी टंचाईला नेहमी सामोरे जावे लागते आणि वर्षातून अनेकदा मोर्चे, आंदोलने निघतात म्हणून सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजना पाणी हा सर्वांचा जिव्हाळ्याचा विषय आहे आणि मुबलक प्रमाणात ह्या शहराला पाणी मिळाले पाहिजे. म्हणून आपण शहरातील नागरिकांना मुलभूत पाणी मिळण्याच्या अनुषंगाने एमएमआरडीए व महापालिका

यांचे निधीतून सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजना लवकरच पूर्णत्वास येत आहे. म्हणून यावर्षीच्या अर्थसंकल्पात रु.68 कोटी तरतूद केली आहे. जेणेकरुन एप्रिल 23 पर्यंत 218 एम.एल.डी. अतिरिक्त पाणी मिळणार असल्यामुळे 2050 पर्यंत कुठल्याही प्रकारची पाणी टंचाई ह्या शहराला भासणार नाही. ह्याचाच एक उपाय योजनेचा भाग म्हणून 68 कोटी रुपयेची तरतूद केली आहे. पाण्याची गरज भागवत असताना हे उद्यानाचा शहर मा. महापौरांनी मागच्याच महासभेत मिरा भाईंदर हे उद्यानाचे शहर आहे ह्या शहरात 72 उद्यान आहेत म्हणून हरित मिरा भाईंदर, स्वच्छ सुंदर मिरा भाईंदर म्हणत असताना ह्या शहरातील उद्यानावर जसे ठाणे शहर हे तलावाचे शहर म्हणून प्रचलित आहे. त्याच धर्तीवर मिरा भाईंदर शहर हे उद्यानाचे शहर म्हणून प्रचलीत व्हावे म्हणून आपण उद्यान विभागा रु.23.65 कोटीची तरतूद केली तर वृक्ष प्राधिकरणाकरिता रु.11.95 कोटीची तरतूद करण्यांत येत आहे. आपली उद्याने कशी आहेत त्याची लोकांना माहिती होण्यासाठी स्वतंत्र वेबसाईट तयार करण्यांत आली आहे. लवकरच येत्या आठवड्याभरात ती अपलोड केल्यानंतर ह्या शहरातील कोणत्या गटनंबर किंवा आरक्षणात कोणते गार्डन आहे कोणत्या फॅसिलिटी उपलब्ध आहेत ते देखील आपल्या वेबसाईडवरुन माहिती मिळणार आहे. उद्यानाच शहर करत असताना हेरिटेज वॉक संकल्पना हे एक नव्याने आणलेले आहे. मिरा-भाईंदर शहराला ऐतिहासिक वारसा आहे. सुमारे 400 वर्षापूर्वी बांधलेले 2 किल्ले आहेत. 18 व्या शतकात पेशवे चिमाजी अप्पा यांनी वसई मोहिमेच्या वेळी हे दोन्ही किल्ले जिंकले होते. तसेच प्राचीन काळापासून देशविदेशातून समुद्राद्वारे व्यापार करायला यायचे तेव्हापासून हा व्यापार चालत आलेला आहे. त्यावेळेपासून भाईंदर बंदर आहे. या ऐतिहासिक वास्तूची तसेच आधुनिक विकसित झालेले, विविध प्रकल्प, उद्याने, स्मारके, पर्यटन स्थळे ह्या शहरात काय काय आहे त्याचा सामान्य नागरिक, विद्यार्थी किंवा बाहेरुन येणारे पर्यटक असतील ह्यांना माहिती व्हावी म्हणून हेरिटेज वॉक संकल्पना राबविण्यात येणार आहे. तसेच मिनी पर्यटन बस चालू करण्याचे जेणेकरुन आपल्या सारखे नागरिक असतील, विद्यार्थी असतील मिरा भाईंदर क्षेत्रातील बिचपासून ऐतिहासिक किल्ल्यापर्यंत जे जे बघण्यायोग्य आहे ते हेरीटेज वॉक ह्या संकल्पनेमार्फत सर्व नागरिकांना बघता येईल. त्याचप्रमाणे राज्य व देशपातळीवर शहरातील मुलांचा खेळाचा दर्जा वाढविण्याच्या अनुषंगाने देश परदेशात आपल्या शहरातील मुलांना वाव मिळावा म्हणून 1.35 कोटीची तरतूद ह्या वर्षी करण्यात आलेली आहे हे करत असताना नाट्गृह हे अंतिम टप्प्यात आहे. शहरातील नाट्यप्रेमींना आनंद मिळण्यासाठी नाट्यगृहाची फिनिशिंग अंतिम टप्प्यात आहे. इंजिनिअरचे काम चालू आहे. लवकरच मिरा भाईंदर वासियांच्या सेवेसाठी सज्ज होणार आहे. एप्रिलपर्यंत काम पूर्ण होईल हे करत असताना इमारत विकास हक्क प्रमाणपत्राच्या मार्फत केलेली आहे. त्यामुळे महापालिकेचा आर्थिक खर्च त्याच्यावर झालेला नाही. त्याच्रपमाणे बायोगॅस घनकचरा प्रकल्प आपल्याकडे 100 टनाचे बायोगॅसचे प्रकल्प प्रस्तावित होते पैकी नवघरचे 20 मेट्रीक टनाचे पूर्ण झाले आहेत आणि 31 मार्च पर्यंत आणखी दोन पूर्ण होणार आहेत. एकूण 100 मेट्रीक टनाचे 8 प्रकल्प प्रस्तावित असताना दोन पूर्ण होऊन आणखी दोन 31 मार्च पर्यंत होतील. 4 पूर्ण आपल्या सेवेस पूर्ण होतील आणि 1200 किलोव्हॅटचा त्यापासून विज तयार होईल. आणि सदर विज कंपनीकडे विक्री केल्यावर त्यामुळे आपली आर्थिक बचत होणार आहेत. शहरातील स्ट्रीट लाईट आहे ती त्या मिथेन गॅस तयार होईल त्यापासून आपल्याला मिळणार आहे हे करत असताना उत्तन सारख्या ठिकाणी बायोमायनिंग आहे एल.टी.पी. प्रकल्प आहे. इतर अनुशंगिक आहे त्याच्या सर्व बायोमायनिंगची प्रक्रिया पूर्ण करुन कचऱ्याची विल्हेवाट लावून सर्व व्यवस्थित पार पाडण्यासाठी ह्यावर्षी रु.71.85 कोटी इतकी करण्यात येत आहे. त्यामुळे डंपिंग ग्राऊडवर साचलेला कचरा आहे तोदेखील प्रोसेस करुन डंपींग ग्राऊंड 100 टक्के मुक्त करण्याचा मानस आहे. परिवहन सेवा रोज 64000 लोक परिवहन सेवेचा लाभ घेतात. हा परिवहन सेवा चालू झाल्यापासूनचा उच्चांग आहे. ह्याचा अर्थ नागरिकांच्या ह्या सेवेवरचा विश्वास वाढत आहे म्हणून ह्यात भर पडावी म्हणून नागरिकांना

दर्जेदार सेवा देण्यासाठी तसेच राज्य शासन व जागतिक बँक आणि पालिका निधी असे सर्वाच्या सहकार्याने अद्यावत बस डेपो व कार्यशाळा बांधून झालेले आहे. बस परिवर्तन करण्यासाठी इंटेलिजंट ट्रान्सपोर्ट सिस्टीम कार्यान्वित करण्यात आली आहे. नागरीकांना त्यांचे मोबाईल वरुन बस लोकेशन, बस शेडयूल, ॲटोमेटीक फेअर कलेक्शन सारख्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. परिवहन सेवा पर्यावरण पुरक असावी म्हणून 50 इलेक्ट्रीक बसेस खरेदी करण्याचा आणि राज्य आणि केंद्र शासनाकडे पाठपूरावा करत आहोत. परिवहन सेवा अधिक आधुनिक व सक्षम करण्यासाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकातून रु.20 कोटी परिवहन विभागास हस्तांतरण करण्यांत येत आहेत. त्याचप्रमाणे ऑनलाईन नागरी सुविधा नागरिकांना घर बसल्या पालिकेची सेवा सुविधा उपलब्ध करुन द्यावी. त्या उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने विभागनिहाय संगणकीय आज्ञावली विकसित करण्यात येत आहे. त्यासाठी विशेष तरतुद रु. 4 कोटी इतकी करण्यात आली आहे. मिरा भाईंदर महापालिकेचे अपेक्षित उत्पन्न लक्षात घेऊन सन 2021-22 चे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम 1398 कोटी 55 लक्ष 81 हजार जमा व 1398 कोटी 40 लक्ष 81 हजार खर्च तसेच सन 2022-23 चे मूळ अर्थसंकल्पात अपेक्षित उत्पन्न 1817 कोटी 90 लक्ष 75 हजार व खर्च 1817 कोटी 60 लक्ष 25 हजार खर्च पाहता 30.50 लक्ष इतका शिलकीचा अर्थसंकल्प कुठल्याही प्रकारची करवाढ दरवाढ न करता मा. स्थायी समितीस सादर करण्यात येत आहे. सदर अंदाजपत्रक सादर करत असताना सर्व शहरवासियांना न्रम विनंती करतो की, सामाजिक बांधीलकी जपा, कोरोना नियमांचे पालन करा, शासनाकडून वेळोवेळी येणाऱ्या सुचनांचे अनुपालन करा, स्वच्छता राखा, प्लास्टिक वापर टाळा, प्रत्येकांनी शहराच्या स्वच्छते मध्ये सहभागी व्हा, मी घाण करणार नाही व करु देणार नाही अशी शपथ घेवू. माझा परिसर, स्वच्छ परिसर, माझे शहर-माझी जबाबदारी या सुत्राचा अवलंब करू आणि वसुंधरेचे रक्षण करु. स्वच्छ सुंदर मिरा भाईंदर राखण्यासाठी प्रशासनास मदत करावी. महाराष्ट्राचे सन्मा. मुख्यमंत्री, सन्मा. उपमुख्यमंत्री, सन्मा. नगरविकास मंत्री, ठाणे व गडचिरोली जिल्हयाचे पालकमंत्री त्याचप्रमाणे सन्मा. पर्यावरण मंत्री मिरा भाईंदर महापालिकेच्या प्रथक नागरिक मा. महापौर मॅडम, मा. खासदार, मा. आमदार, राज्याचे मा. मुख्य सचिव, मा. प्रधान सचिव, मा. विभागीय आयुक्त काकेण, मा. जिल्हाधिकारी ठाणे, मा. उपमहापौर साहेब, मा. स्थायी समिती सभापती, मा. सभागृहनेता, मा. विरोधी पक्षनेता, सर्व पक्षाचे गटनेते तसेच सर्व नगरसेवक तसेच शहरातील सर्व नागरिक विचारवंत, वृत्तपत्र प्रतिनिधी, समाजमाध्यमे ह्यांनी प्रशासनाला वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतो. तसेच शहरातील नागरिकांना आव्हान करतो की आपले मिरा भाईंदर महानगर विकसित करण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे ही विनंती. धन्यवाद.

**सभा संपल्याची वेळ :- संध्या. 4.00 वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका